*कथा क्रमांक ५*

# मोजमाप

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि दिवा लावणार इतक्यात सूर ऐकू आले, ‘Happy Birthday to you, Happy Birthday to you, Happy Birthday Dear Radha, Happy Birthday to you!’

केकवरील मेणबत्तीच्या मिणमिणत्या उजेडात चेहरे जरी व्यवस्थित दिसत नसले तरी फक्त आवाजावरून राधाने जमलेल्या सगळ्यांचा अंदाज बांधला होता. वाढदिवसाच्या निमित्ताने का होईना, पण राधाचा राधेय संध्याकाळच्या सगळ्या अपॉईंटमेंट्स रद्द करून आज लवकर घरी आला होता. व्यवसायाने हार्ट सर्जन असल्यामुळे कदाचित हृदयाची गुंतागुंत त्याला अचूक ठाऊक होती. पूर्वा आणि संकेत, लव्हबर्ड्स, याशिवाय त्यांची वेगळी ओळख करून देणे कदाचित चुकीच ठरेल. शाळेत असतानाच एकमेकांच्या प्रेमात पडले आणि योग्य वेळ येताच लग्नाच्या बंधनात अडकले. आज बरा वर्षांनंतर श्लोकचा आवाज ऐकल्यावर कॉलेजमधील आठवणींनी राधा भारावून गेली. दिवे लागूच नयेत असे तिला वाटत असतानाच कुणीतरी स्विच ऑन केले आणि झुंबराच्या त्या लख्ख प्रकाशात आठवणी तशाच विरून गेल्या. राधेय समोरच होता तरीही एका ओळखीच्या आवाजाचा मागोवा घेणारी राधाची नजर खिडकीपाशी उभ्या असलेल्या श्लोककडे गेली. अगदी काल परवाच भेटल्यानंतर आज पुन्हा भेटतोय अशा विश्वासात त्याने तिला 'hi' म्हटले. स्वप्नातून जागे व्हावे तशी स्वतःला सावरत राधा नुसती हसली. राधेयच्या नजरेला नजर ना देताच "मी आलेच हं !’’ असं म्हणत बेडरूमच्या दिशेने वर निघून गेली.

राधेय या सर्वांना कॉलेजमध्ये एक वर्ष सीनियर होता पण मजा करायला मात्र हे पाचहीजण एकत्र जमायचे. श्लोक तसा खूप कमी बोलायचा. संकेत त्याला गंमतीत म्हणायचा देखील, “ अरे काही नाही तर निदान एक श्लोक तरी म्हण.” राधा आणि पूर्वा सुद्धा जीवाभावाच्या मैत्रिणी होत्या. बऱ्याच वर्षांनंतर श्लोक परदेशातून भारतात परतला होता. अचानक त्याची पूर्वाशी भेट झाली. तो नाही म्हणत असतानाही पूर्वा त्याला राधाच्या घरी घेऊन आली होती. राधेयला बहुधा त्याचं येणं तितकंसं रुचलं नव्हतं. पूर्वाही आज तशी कमीच बोलत होती. श्लोकला इथे आणून काही चूक तर नाही ना केली अशी शंका तिला सतावत होती. श्लोक मात्र कोपऱ्यातल्या एका खुर्चीवर बसून कॉफीटेबलवरील मासिक वाचल्याचा आव आणत होता. खरं तर त्याचंही मन आठवणींचे शंखशिंपले वेचण्यात मग्न झालं होतं.

पावसाचा जोर काही कमी होत नव्हता. बाहेर आता बऱ्यापैकी काळोखही पडला होता. तयार होऊन येण्याकरता वर बेडरूममध्ये गेलेली राधा तशीच ओल्या अंगाने बराच वेळ आरश्यासमोर उभी होती. मनात आठवणींचं वादळ उठलं होतं. अशातच एक वीज कडाडली आणि कॉलेजच्या ॲन्युअल डेची पावसाळी रात्र तशीच्या तशी तिच्या डोळ्यासमोर चमकून गेली. राधाने डोळे घट्ट मिटून घेतले.

त्या वर्षीचा तो annual डे खरतर विशेष होता , कारण junior college चा तो शेवटचा annual डे होता . पुढच्या वर्षी हे सर्वजण सिनिअर college चे विद्यार्थी होणार होते .एक वेगळं , नव पर्व सुरु होणार होतं . त्यामुळे आज खूप धमाल करायची, गोंधळ , गल्ला करायचा अस सर्वांनी ठरवून टाकलं होतं. कारण एकदा का सिनिअर college चालू झालं कि जो तो आपापले ध्येय गाठण्यात मग्न होणार होता . मजा मस्ती बरोबर भविष्याचीही जाणीव ठेवावी लागणार होती. पूर्वा आणि संकेतचे आयुष्यातले पुढचे सगळे प्लान आधीच ठरले होते . पूर्वाला ICWA करायचे होते व संकेतला CA व्हायचं होतं. ते झालं , नोकरी मिळाली कि लग्न . श्लोकला अभ्यासात विशेष रस नव्हता पण तो मुळातच हुशार होता . तो एक स्पोर्ट्स person होता . college च्या badminton टीम चा captain , पट्टीचा swimmer आणि karate black बेल्ट धारक होता . राधाला मात्र वकील होऊन अन्यायाविरोधात लढायचे होते , पीडितांना न्याय मिळवून द्यायचा होता . तिचे व्यक्तिमत्व हि तसेच होते , स्पष्ट आणि तडफदार. रंगाने सावळी असली तरी राधा दिसायला खूपच गोड आणि आकर्षक होती . उंच शिडशिडीत बांधा , टपोरे डोळे , गालावरच्या खळ्या तिला अधिकच मोहक बनवत , पण तिच्या चेहऱ्यावर जो हसतमुखपणा आणि प्रसन्नता असे ती सर्वांनाच आकर्षित करत असे . जवळ जवळ सगळंच college राधाच्या प्रेमात होते . इतकेच नाही तर सर्व शिक्षकांचीही ती लाडकी होती . इतके सारे असूनही तिचे पाय अजून जमिनीवरच होते . college च्या beauty queen बरोबरच ती college ची melody queen हि होती . राधाचा आवाज खूप मधूर होता . राधा आरशासमोर उभी राहून अजूनही पूर्वीच्याच आठवणीत हरवली होती . annual डे च्या निमित्ताने तिच्या गाण्यांचा एक विशेष कार्यक्रम ठेवला होता collegeने. तिला आठवलं ती वादकांन बरोबर गाण्याची rehearsal करत होती आणि मध्येच तिला जाणवल कि श्लोक rehearsal रूमच्या बाहेर corridor मध्ये अस्वस्थपणे येरझार्या घालतोय , रूम च्या आत बाहेर करतोय. तिला कळेना ह्याला काय झालं . पण ती रियाज सोडून जाऊही शकत नव्हती.

annual डे च्या एक एक आठवणी डोळ्यांसमोरून पुढे सरकत होत्या . कार्यक्रम सुरु झाला आणि compairer च्या रुपात जेव्हां राधेय stage वर आला तेव्हां सगळेच आश्चर्य चकित झाले . राधेय त्याच college चा पण science faculty चा विद्यार्थी . अत्यंत सुरेख , चोख आणि व्यवस्थित event management करण्याचा त्याचा हातखंडा होता . कदाचित म्हणूनच त्याला बोलावले असणार . पण पठ्याने ह्या चांडाळ चौकडीला ताकास तूर लागू दिला नव्हता . पूर्वा , संकेत , श्लोक आणि राधा ह्यांचा खास group होता . ते कोणाला आपल्या group मध्ये ना घेत , ना ते स्वतः इतरानमध्ये जात . राधेय त्यांच्या पेक्षा senior असला तरी तो ह्या चौकडी बरोबरच असे.तो कसा आणि कधी ह्यांच्यात सामील झाला ते ह्या चौघांनाही कळले नाही . असो , पण त्याला बघून सगळेच खुश झाले .

कार्यक्रम चालू झाला आणि राधाची गाणी एका वर एक once more घेत होती. सगळं वातावरण कसं प्रसन्न आणि सुंदर वाटत होतं . कार्यक्रम संपत आला आणि .अचानकच अवेळी पाउस सुरु झाला . बघता बघता जोर वाढत चालला तेव्हां आयोजकांनी कार्यक्रम आवरता घेतला . अचानक आलेल्या पावसा मूळे सर्वांचीच धावपळ झाली होती . संकेत आणि श्लोक , दोघेही त्या दिवशी scooty घेऊन आले

होते ,कार्यक्रम उशिरा  पर्यंत चालला तर उगीच घरी जायला उशीर नको म्हणून .पूर्वाला  घरी सोडायला संकेत जाणार होता तर  श्लोकने राधाला सोडण्याची जबाबदारी घेतली होती . आठवणीत रमलेली राधा राधेय च्या हाकांनी भानावर आली आणि पटापट आवरू लागली .पण मन मात्र अजुनही श्लोकच्याच आठवणींमध्ये रमले होते . पाउस पडत होता आणि वारा हि खूप होता म्हणून ती श्लोकला घट्ट धरून scooty वर बसली होती.  पण आजचा श्लोक तिला रोजच्या श्लोक पेक्षा वेगळाच वाटत होता. त्याच्या बरोबर भिजत भिजत जाताना तिला काहीतरी वेगळंच जाणवत होतं . ती त्याच्या बरोबरच्या  प्रवासात हरवलेली असतानाच पूर्वाच्या हाका आल्या . "अगं , झालं का ? किती वेळ ? लवकर खाली ये ना ."तिची वाक्य कानावर येत होती . " आलेच हं "म्हणत  ती  तयार होत होती , पण चित्त  मात्र काही श्लोक वरून हलत नव्हतं . सहा फूट उंच , गोरा , देखणा श्लोक त्या annual डे च्या रात्री तिला जसा दिसला तसा तिला आधी कधीच दिसला नव्हता . ती त्याच विचारात तयार होउन खाली आली आणि नकळत तिची नजर श्लोकला शोधू लागली.ती खाली येताच श्लोक्ने तिला लाल गुलाबांचा एक मोठा गुच्छ देत विष केले . तिला हा गुच्छ ओळखीचा होता .लग्न व्हायच्या आधी दोन एक वर्षापर्यंत  प्रत्येक वाढदिवसाला श्लोक कडून हा असाच लाल गुच्छ तिला  मिळत होता . आणि एका वर्षापासून तो अचानक यायचा बंद झाला . आणि आज मिळाला तो हा आता लग्न झाल्यावर , अनेक वर्षानंतर , anuual डे ला आलेल्या अचानक पावसासारखा ...

वाढदिवसाला श्लोककडून असाच लाल गुच्छ तिला मिळत होता. आणि एका वर्षापासून तो अचानक यायचा बंद झाला. आणि आज मिळाला तो हा आता लग्न झाल्यावर, अनेक वर्षांनंतर. ॲन्यूअल डेला आलेल्या अचानक पावसासारखा....

आठवणी बाजूला सारत हातातला गुच्छ हुंगत राधाने श्लोकला 'thank you' म्हटलं. श्लोक किंचित हसला. राधेय दुरुन हे पहात होता. तो राधाजवळ येऊन तिच्या खांद्यावर हात ठेऊन श्लोकला म्हणाला, "बरे झाले बाबा तू फुले आणलीस. आपल्या काही असे लक्षात नाही रहात. हॉस्पिटल सोडून सरळ घरी आलो बघ. नवऱ्याने नाही तरी खास मित्राने birthday girl ची आवड लक्षात ठेवली." श्लोकच्या हातात ड्रिंक देऊन त्याने संभाषण चालू ठेवले. "कधी आलास तू? किती दिवस राहणारेस?"
" आठवड्यापूर्वी आलो. आता इथेच असेन मी. माझ्या कंपनीने मला इकडे निदान 2-3 वर्षांसाठी तरी मार्केटिंग डायरेक्टरची पोस्ट देऊ केलीय. परवा सहज पूर्वा भेटली अन मला ' चल, राधाला सरप्राइज़ कर ' म्हणून या पार्टीला आणले तिने." श्लोक.
" फार बरं केलंस. इतक्या वर्षांनी भेटतोय आपण. चालू दे तुझ्या आणि राधाच्या गप्पा. मी थोडं इतर पाहुण्यांशीही बोलतो." म्हणत राधेय गेलासुद्धा.
राधाने श्लोककडे निरखून पाहिले. तसा आधीच तो देखणा होता, तशात परदेशात राहिल्यामुळे चेहेऱ्यावर आत्मविश्वासाचं तेज चढलं होतं, बोलण्यातली सफाईही वाढली होती. राधाने मनापासून दाद दिली, "अमेरिका मानवलीय रे तुला. यू लुक शार्प. "
श्लोक हसून म्हणाला, " तू सुद्धा. सो हाऊ आर यू डुइंग? तुझे नाटक, गाणे काही चालू आहे का, की पक्की गृहिणी बनलीयेस?"
" नाटकं बिटकं नाही जमत रे आता. नुसतं गाणं अधूनमधून." राधा.
श्लोकनं खट्याळपणे म्हटलं, " बघ, माझ्याशी लग्न केलं असतंस तर अशी वेळ आली नसती. चान्स होता तुला, घालवलास बघ. "
राधा ऐकतच राहिली. हा श्लोक बोलतोय? किती अबोल होता? अबोल कुठला, almost घुम्याच, थट्टाबिट्टा करणं तर दूरच. पण कधी मोकळेपणानं बोलणंही नाही. आणि आता हे इतकं? राधाचे विचार चालू होते. पण लगेच स्वतःला सावरून श्लोकच्या डोळ्याला डोळा भिडवून ती त्याला म्हणाली, " तू कधी मला विचारलं तरी होतंस, लग्न करशील का म्हणून? "
थोडा गंभीर होत श्लोक म्हणाला, " आडून आडून अप्रत्यक्षपणे मी तुझा कल बघायचा प्रयत्न खूप केला. पण सरळ विचारायची हिंमत झाली नाही. वाटलं, जुगनूने चांद की तरफ देखा और जुगनू गिर गया."
आता राधाच्या डोळ्यात पाणी जमायला लागलं. ती हळुवारपणे बोलू लागली, " श्लोक,

it’s a DONE thing.  तो भूतकाळ होता. भूतकाळाचा वर्तमानकाळाशी संबंध जरूर असतो; नाही असं नाही. पण आपल्या भूतकाळातल्या चांगल्या आठवणी, ती मैत्री तशीच राहू दे.  त्या दिवसांची गोड आठवण राहू दे. बस्स्. पण त्याची लुडबुड वर्तमानकाळात होऊ देऊ नकोस. मी तसंच ठरवलं न् आज आनंदात आहे मी. राधेय साधा सरळ माणूस आहे.  काव्यबिव्य त्याचा प्रांत नाही, आवडही नाही. पण एके दिवशी त्याने कॉलेजच्या लायब्ररीत मी पुस्तकं पहात असताना “ लग्न करशील का “ असं स्पष्ट विचारलं अन् मी विरघळले. " I am ready for any response.  आय ॲम नॉट वरीड अबाउट रिजेक्शन.  पण माझ्या भावना मी व्यक्त केल्या याचं तरी समाधान राहील माझ्याजवळ. " म्हणाला. त्यातून, श्लोक, आपल्या आणाभाका, चांदणी रात्र असं काही झालं नव्हतंच. भावनांचाही गोंधळच होता.  सो फरगेट द पास्ट, फेस ते रिॲलिटी, ओ के फ्रेंड? " म्हणत त्याचा हात धरून थोपटल्यासारखं केलं.

" हॅलो एव्हरीबडी." राधेय ओरडून म्हणत होता, " मी राधासाठी आता एक गाणं म्हणणार आहे. प्लीज़ बेअर विथ मी." म्हणत त्याने सीडी लावली आणि lip sync सुरु केलं. सगळे हसायला लागले.  " हम तेरे बिन अब रह नही सकते, तेरे बिना क्या वजूद मेरा " राधाला रडूच कोसळलं. तिचं हे आवडतं गाणं. स्वतःला गाता येत नसतानाही राधेय आपल्या भावना या मार्गाने व्यक्त करतोय, या विचाराने तिला राहवलं नाही. श्लोककडे दुर्लक्ष करून धावत जाऊन ती राधेयच्या मिठीत शिरली.

पार्टी संपत आली आणि आलेले सगळे लोक एक एक करून घरी जायला लागले. पूर्वा आणि संकेत जायला निघाले तसा श्लोक सुद्धा त्यांच्याबरोबर जायला निघाला तसा राधेय त्यांना म्हणला कि एवढी काय जायची घाई आहे, थांबा थोडा वेळ. पूर्व ला वातावरणातला awkwardness आधीच जाणवला होता त्यामुळे ती म्हणाली नाही आता खूप उशीर झालाय निघतो आम्ही. तुम्ही सगळे पुढच्या शनिवारी आमच्या घरी जेवायला या, मस्त गप्पा मारू बसून. राधा काही म्हणायच्या आत राधेय हो म्हणला देखील.
शनिवार उजाडला, संध्याकाळी राधा आणि राधेय पूर्वा च्या घरी पोचले देखील. श्लोक अजून आला नव्हता, श्लोक बरोबर श्रेया येतेय असे पूर्वा म्हणली, कोण श्रेया असे विचारणार तेवढ्यात बेल वाजली आणि श्लोक- श्रेया आले देखील.
राधा दुरूनच बघत होती. आकर्षक व्यक्तिमत्वाची श्रेया दिसायला अगदी सुंदर नसली तरी तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज होते. बोलता बोलता कळले कि ती Cancer research करते आणि गाण्यात देखील विशारद आहे. राधेय शी तर ती जी चर्चा करत होती त्यावरून तिला तिच्या विषयात नक्कीच चांगली माहिती आहे हे समजत होते.
श्लोक राधा शेजारी येउन बसला, तेव्हा न राहवून राधाने  विचारले कि काय रे लग्न कधी करणार? श्लोक म्हणला कि माझे श्रेया शी २ वर्षांपूर्वीच लग्न झालंय. राधा म्हणली, कि बोलावले सुधा नाहीस. श्लोक पटकन म्हणला, तू तरी कुठे बोलवले होतेस, राधेय शी लग्न काय ठरले तुझे तू तर विसरूनच गेलीस मला.
राधा स्वताला सावरत म्हणाली कि छे, असे काही नाही. मला वाटले कि तुला कदाचित वाईट वाटेल म्हणून…. श्लोक हसायला लागला, त्याला इतके हसायला आले कि त्याच्या डोळ्यातून पाणी यायला लागले.

आणि तो म्हणला अग, मला तू आवडायचीस आणि माझे तुझ्यावर प्रेम होते पण तुझे नव्हते, big deal? आता तुझे प्रेम नाही म्हणून देवदास बनून फिरतोय असे वाटले का तुला. तुझे प्यार नाही हुआ तो नाही हुआ.माझे आणि श्रेया चे मस्त चाललाय. आणि आज या क्षणी तर वाटतय कि तुझ्याशी नाही झाले लग्न ते बरेच झाले.श्रेया माझ्या आणि तिच्या घरच्यांना तर साम्भाल्तेच पण कल्पना हि करणार नाही अशा प्रसंगांना तिने एकटीने तोंड दिलंय, माझ्या पाहण्यातली तर ती एक समर्थ स्वयंसिद्धा आहे. राधा बघतच राहिली, आपण कि एकांगी विचार करत होतो असे तिला वाटायला लागले. तिची भाची  म्हणायचीच तिला कि तू किती जुन्या विचांची आहेस. heart-break झाले तर झाले त्यात काय, तुम नाही कोई और सही.
आणि अचानक राधा ला आपण स्वताला उगाच महत्व देतोय असे वाटायला लागले. एवढ्यात राधेय तिला येउन म्हणला कि अगं तू श्रेया शी बोललीस का? काय छान  आहे हि मुलगी. आणि राधा मनात क्षण का होईना

श्रेया बद्दल जलसि येउन गेली. आत्ता पर्यंतच्या आयुष्यात तिला सतत center of attraction असण्याची सवय होती त्यामुळे श्रेया नक्की एवढी काय great आहे बघू तरी असा विचार करून राधा श्रेया शी बोलायला गेली.

श्रेयाकडे बघून एक लक्षात आले राधाच्या कि ती सर्वांपेक्षा बरीच लहान दिसत होती म्हणजे तिने आपल्यापेक्षा १२-१३ वर्षांनी  मोठ्या असलेल्या श्लोकशी लग्न केले होते.थोडे कनफ्युजन होते.राधा श्रेयाशी बोलायला गेली .

“हाय, मी राधा ”

“हाय, तुम्हाला कोण ओळखत नाही, तुम्ही फार सुंदर गाता तुमचा आवाज फार गोड आहे “

“अहो जाहो नको करू प्लीज, मैत्रीणीला कोणी अहो जाहो करत का?”राधा लटके रागवत बोलली,“आणि गाणे म्हणशील तर तू हि शिकलेली आहेस ,मेहफिल जमऊ  एकदा”

“ok तू अहो जाहो करण्याइतकी मोठी दिसत नाहीस हेही खरेच,बाय द वे तुला हा केसरी रंग फार शोभून दिसतो आहे, you look marvalous! ”

“ आणि काय ग एवढी गोड असून तू डॉक्टर कशी झालीस?”

श्रेया  हसून म्हणाली “मला श्लोक भेटणार होता म्हणून मी डॉक्टर झाले”

हसताना श्रेया  फार छान दिसत होती,श्लोकचे नाव घेतल्यावर राधाच्या मनात एक सूक्ष्म कळ उठली.तिने लांब उभ्या असलेल्या श्लोककडे पहिले,तो त्यांच्याकडेच पाहत होता.काय विचार करत असेल श्लोक ? श्रेयापेक्ष आपण अधिक सरस आहोत हे बघत असेल का?

तेवढ्यात श्लोकचा मोबाईल वाजला आणि तो ओरडला “ श्रेया लवकर चल कुहू क्लासहून येताना सायकलचा धक्का लागून वरून पडली तिला खूप लागले आहे, come fast darling ” आणि ते दोघे लगबगीने निघून गेले.

पार्टीतील सगळी मजाच गेली. राधा पूर्वाला मदत करत होती किचन मध्ये आणि डोक्यात विचार चालू होते.कसे असेल दोघांचं घर ,एकमेकांशी संबंध, श्रेयाने वयात फरक असताना का लग्न केले असेल. पूर्वा थोडी फ्री झाल्यावर श्रेयाने विचारले, “ कोण पडले म्हणून गेली ती दोघे?”

“सांगते तुला सगळे मलाही  कालच कळले.” पूर्वाने टेबल आवरता आवरता सांगायला सुरवात केली.

“श्लोक भारतातून गायब झाला, जॉब करता करता त्याला वेगवेगळ्या देशात फिरावे लागले ,९-१० वर्षे नुसता फिरत होता त्यात खाण्यापिण्याचे खूप हाल झाले, तब्येतीकडे पूर्ण दुर्लक्ष झाले, आणि त्याच्या सारखे पोटात दुखू लागले सगळ्या टेस्ट झाल्या पण काही डायग्नोसीस होई ना. तो एक स्पोर्ट पर्सन  असल्यामुळे त्याला सहन करण्याची ताकद होती ”

राधा अगदी लक्ष देऊन ऐकत होती “ my god! काहीतरीच ग पूर्वा तू मला भलते सलते सांगणार नाहीएस”

“तुला जे ऐकायचे नाही तेच आहे ग, श्लोकला कॅन्सर आहे intestine चा, आता बरा आहे तो.त्याची treatment बरीच वर्ष चालली तेव्हा त्याची आणि श्रेयाची ओळख झाली.श्रेया रिसर्च सेंटर मध्ये आहे. मरणाच्या दारातून खेचून

आणले आहे तिने त्याला.चांगल्यातला चांगला डॉक्टर, सर्व सोयी,मानसिक आधार अशी खूप मदत केली तिने.श्लोक्ने तर जगायची अशाच सोडली होती पण हिने अहोरात्र सेवा केली श्लोकची."

राधा दिग्मूढ होऊन ऐकत होती.

"अशीच काळजी घ्या घरी, असे श्रेयाने सांगितले तेव्हा पठ्या म्हणाला मी इथेच येईन रहायला,तुम्ही आहात ना इथे"

पूर्वा सांगत होती.

"श्लोक पेक्षा १०-१२ वर्षांनी लहान असलेली श्रेया त्याच्या प्रेमात पडली आणि दोन वर्षांपूर्वी त्यांनी लग्न केले"

" कुहू कोण ?"

"ती अजून एक स्टोरी आहे. कुहू ४ वर्षाची असताना तिची आई हॉस्पिटल मध्ये cancer ने गेली, तिला कोणीच नव्हते म्हणून ही दोघे तिला सांभाळतात आणि तिला adopt केले आहे."

तेवढ्यात बेल वाजली आणि श्रेया आणि श्लोक कुहूला घेऊन आत आले.कुहू चे डोळे आणि गोबरे गाल लाल लाल झाले होते हातात chocolate होते मान श्रेयाच्या खांद्यावर विसावली होती.

राधाची श्लोक कडे पाहयची हिम्मत झाली नाही.श्रेया कुहुलाच सांभाळत होती.सगळ्यांनी पटापट जेऊन घेतले.

घरी आल्यावर राधा एकदम सुन्न झाली.राधेय लगेच झोपायला गेला.राधा नुसती अस्वस्थ होऊन बसून राहिली.

आपले घर आपला नवरा,मुले ह्या सगळ्याचा तिला अभिमान वाटे.आपण सर्वांना कसे निट सांभाळले आहे,गाडी,बंगला सर्व कसा हेवा वाटावा असे आहे,मुले हुशार आहेत,कुठे खोड काढायला जागा नाही.आनंदाचे असे मोजमाप असते का?

श्रेयाने जे केले तसे करायला जमले असते का आपल्याला,राधा मनाशीच विचार करीत होती.एखादी मनाने खंबीर असलेली,प्रचंड ओढ आणि ध्यास असणारी खूप प्रेमळ अशी मुलगीच हे करू शकते.श्रेया आपल्यापेक्षा खूप खूप उंच हिमालयावर असल्यासारखी तिला भासली.आपण आपला आनंद वस्तूंच्या मूल्यांशी जोडतो आणि श्रेया कुठल्यातरी वेगळ्याच तरल पातळीवर जगते आहे ,श्रेयाच्या जगण्याला खोल अर्थ प्राप्त झाला आहे,सतत झिरपणारा आनंद याचा ती अनुभव घेते आहे.राधा आनंदाच्या या बिलोरी रूपाने भाराऊन गेली आणि आपल्या हातातून काय निसटले याचा ती विचार करू लागली.

रात्रीची वेळ होती पावसाची रिप रिप चालू झाली होती, दूर कुठेतरी मुकेशचे गाणे लागले होते

"किसी के मुस्कुराहटो पे हो निसार...................